माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : १४/२०१९, ४३०/२०१९ व ६८४/२०१९**

**तक्रारकर्ता, श्री.राजेश बालाप्रसाद पांडे,**
रा.फुलसावंगी, ता.महागाव, जि.यवतमाळ

विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (निवडणुक),**
**तहसिल कार्यालय, महागाव, ता.महागाव, जि.यवतमाळ**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
तहसिल कार्यालय, महागाव, ता.महागाव, जि.यवतमाळ

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : ३०.११.२०२३**

तक्रारकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| ०७.०९.२०१८ | -- | ०५.०२.२०१९<br>१६.०२.२०१९<br>१८.०३.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.३४७/२०१५ दि.०७.०९.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे ३ तक्रार अर्ज दाखल केलेले आहे. सदर तक्रारीवर दिनांक ३०.११.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. उत्तरवादी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र.३४७/२०१५) मध्ये दिनांक ०७.०९.२०१८ रोजी सुनावणी घेवून " अपिलार्थीस अद्यापही माहिती देण्यात आली नसल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जोडपत्र अ नुसार मागितलेली माहिती नोंदणीकृत डाकेने विनाशुल्क पुरवावी व तसा अनुपालन अहवाल आदेश मिळाल्यापासुन ३० दिवसामध्ये आयोगासमोर स्वत: हजर राहुन सादर करावा. २. अपिलार्थीस जोडपत्र अ नुसार माहिती न देण्यास जन माहिती अधिकारी श्री.डी.आर.बळी जबाबदार आहेत. त्यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस माहितीचे प्रदान न केल्यामुळे कलम ७(१) चा भंग केला आहे. त्यामुळे केंद्रीय माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(८) (ग) व कलम २० (१) नुसार ते शास्तीसाठी पात्र ठरतात त्यामुळे त्यांना रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) एवढी शास्ती करण्यात येते. ३. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर निर्णयाची प्रत नोंदणीकृत डाकेने तत्कालीन / विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांना पाठवावी. तसेच त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे मासीक वेतनातुन वर नमुद केलेल्या शास्तीची रक्कम एकमुस्तपणे विहीत पध्दतीने वसुल करुन माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या संबंधित लेखीशिर्षामध्ये चालानाव्दारे जमा करावी व चालानाच्या प्रतीसह अनुपालन अहवाल आदेश मिळाल्यापासुन ३० दिवसामध्ये आयोगासमोर व्यक्तिश: हजर राहुन सादर करावा." असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, द्वितीय अपील क्र. ३४७/२०१५ यात दि.०७.०९.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्यामुळे प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल करण्यात आला असून यात मागील सुनावणीत वरील आदेशाचे अनुपालन करण्याबाबत याआधिच मौखिक निर्देश जारी करण्यात आले असून या प्रकरणी अद्यापही अनुपालन अहवाल तसेच कुठलाच खुलासा प्राधिकरणाच्या वतीने सादर करण्यात आला नाही. ही बाब लक्षात घेता, नायब तहसिलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय महागांव व तहसिलदार, महागांव , जि.यवतमाळ यांना अनुपालन अहवाल सादर करण्याचे तसेच प्रस्तुत प्रकरणी पुर्वसूचना न देता सुनावणीस अनुपस्थित राहिल्याबद्दल त्यांचेविरुध्द महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा. दि.०१.१२.२०१५ अन्वये कार्यवाही का करण्यात येवू नये ? याबाबत नोटीस जारी करण्यात येत असून, त्यावरील स्पष्टीकरण पुढील सुनावणीस व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करण्यात यावे.

## अंतरिम आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी द्वितीय अपील क्र.३४७/२०१५ यात दि.०७.०९.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन तसेच पुर्वसूचना न देता सूनावणीस अनुपस्थित राहिल्याबद्दल त्यांचेविरुध्द महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकिर्ण२०१५/प्र.क्र.(२२२/१५)सहा. दि.०१.१२.२०१५ अन्वये कार्यवाही का करण्यात येवू नये ? याबाबतचा स्वयंस्पष्ट लेखी खुलासा पुढील सुनावणी दि. रोजी व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ कार्यालय अमरावती विभाग, अमरावती
सत्यमेव जयते

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ अमरावती

ठिकाण : अमरावती
दिनांक : ३०.११.२०२३
जावक क्रमांक 632 दिनांक 06 FEB 2024